# राज्यातील हवामान, खरीप हंगाम २०२०-२१ पिक पेरणी व पिक परिस्थितीचा दिनांक १३/०७/२०२० अखेरचा अहवाल

**हवामान व पर्जन्यमान** : राज्यात दि.११ ,जून २०२० रोजी मान्सूनचे आगमन झाले. दि.१६ जून ,२०२० पर्यंत मान्सूनने संपूर्ण महाराष्ट्र व्यापला. अहवाल कालावधीत बहुतांश विभागात आकाश ढगाळ होते व बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

कोंकण विभागात बहुतांश ठिकाणी जोरदार ते अतिजोरदार तर तुरळक ठिकाणी मुसळधार स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली. नागपूर व कोल्हापूर विभागात तुरळक ठिकाणी जोरदार ते अतिजोरदार तर नाशिक, पुणे, औरंगाबाद, लातूर व अमरावती विभागात तुरळक ठिकाणी जोरदार स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

**पर्जन्यमान (२०२०)**

दि. १ जून ते १३ जुलै कालावधीमधील राज्यातील सरासरी पाऊस ३४३.४ मि.मी. असून दि.१३ जुलै, २०२० पर्यंत ३६२.९ मि.मी. म्हणजेच सरासरीच्या १०४.८ टक्के पाऊस झाला.

राज्यात दि. १ जून ते १३ जुलै, २०२० अखेरीस सरासरीच्या तूलनेत प्रत्यक्ष पडलेल्या पावसानुसार (प्रागतिक) जिल्ह्याची वर्गवारी खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | पर्जन्यमान टक्केवारी | जिल्हे संख्या | जिल्ह्यांची नावे |
|---|---|---|---|
| १ | ० ते २५ % | ० | --- |
| २ | २५ ते ५० % | ० | --- |
| ३ | ५० ते ७५ % | ४ | रायगड, नंदुरबार, कोल्हापूर, गडचिरोली. |
| ४ | ७५ ते १०० % | १३ | ठाणे, रत्नागिरी, पालघर, पुणे, सातारा, उस्मानाबाद, नांदेड, अकोला, वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर. |
| ५ | १०० % पेक्षा जास्त | १७ | सिंधुदुर्ग, नाशिक, धुळे, जळगांव, अहमदनगर, सोलापूर, सांगली, औरंगाबाद, जालना, बीड, लातूर, हिंगोली, परभणी, बुलढाणा, वाशिम, अमरावती, यवतमाळ, |

राज्यात १३ जुलै, २०२० अखेर पर्जन्यमान सरासरीच्या तूलनेत एकूण ३५५ तालूक्यांपैकी ९ तालूक्यांत २५ ते ५० %, ५० तालूक्यात ५० ते ७५ %, ८२ तालूक्यात ७५ ते १००% तर २१४ तालूक्यात १०० % पेक्षा जास्त पाऊस झाला आहे.

**किड व रोग-**

राज्यात काही ठिकाणी ज्वारी व मका पिकावर लष्करी अळीचा, सोयाबीन पिकावर हेलिकोव्हर्पा, गर्डल बीटल, खोडमाशी व तंबाखुवरील पाने खाणारी अळी, कापूस पिकावर गुलाबी बोंड अळी, अमेरिकन बोंड अळी, मावा तुडतुडे, ऊस पिकावर लष्करी अळी व हुमणीचा, भात पिकावर गादमाशी व खोडकिडीचा प्रादुर्भाव दिसून आला.

दि.१०.०७.२०२० अखेरच्या अहवालानुसार राज्यात दि.०९.०७.२०२० अखेरील सप्ताहात नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या नुकसानीची माहिती निरंक आहे.

**खरीप हंगाम २०२०-२१ पिक पेरणी -**

राज्यात खरीप पिकांचे सरासरी क्षेत्र (ऊस वगळून) १४१.९९ लाख हेक्टर असून दि.१३ जुलै, २०२० अखेर ११७.८२ लाख हेक्टर क्षेत्रावर (८२.९८%) पेरणी झाली आहे. तसेच राज्यात खरीप पिकांचे ऊस पिकासह सरासरी क्षेत्र १५१.३४ लाख हेक्टर असून ११८.७२ लाख हेक्टर क्षेत्रावर (७८.४%) पेरणी/लागवड झाली आहे. राज्यात भात तसेच नागली पिकांच्या पुर्नलागवडीची कामे सुरु आहेत. पेरणी झालेली पिके उगवण ते वाढीच्या अवस्थेत आहेत. पिकांमध्ये आंतरमशागतीची कामे सुरू आहेत.

**सन-२०२०-२१ चे खरीप हंगामातील पेरणी क्षेत्राचा सरासरी पेरणी क्षेत्राशी तुलनात्मक तक्ता**




**विभागीय पिक परिस्थिती-**

**कोकण विभाग-**

**हवामान-** अहवाल कालावधीत विभागात आकाश ढगाळ होते. आद्रतेच्या प्रमाणात वाढ झाली असून, तपमानात घट झाली आहे. तसेच बहुतांश ठिकाणी जोरदार ते अतिजोरदार तर तुरळक ठिकाणी मुसळधार पाऊस झाला.

**खरीप हंगाम-२०२०-२१**

विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र ४.४२ लाख हेक्टर असून दि.१३ जुलै, २०२० अखेर ०.९८ लाख हेक्टर क्षेत्रावर (२२.१४%) पेरणी झाली आहे. विभागात खरीप हंगामासाठी भात व नाचणी पिकांची रोपवाटिका तयार करण्याची कामे प्रगतीपथावर असून, अनुक्रमे ३५,६६४ हे. व ४,३४३ हे. क्षेत्रावर पेरणी झालेली आहे. रोपवाटिकेतील रोपे उगवण ते वाढीच्या अवस्थेत आहेत. भात लागवड करण्यासाठी चिखलणीच्या तसेच भात व नाचणी पिकांच्या पुर्नलागवडीच्या कामांना वेग आला आहे. याशिवाय तूर, मूग, उडीद व इतर तेलबिया पिकांच्या पेरणीची कामे सुरु असून पिके उगवणीच्या अवस्थेत आहेत.

**किड व रोग -**

रत्नागिरी जिल्हयात भात पिकावर खोडकिडीचा प्रादुर्भाव दिसून आला.

**नाशिक विभाग-**

**हवामान-** अहवाल कालावधीत विभागात आकाश ढगाळ होते. हवा दमट होती. तसेच बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या तर तुरळक ठिकाणी जोरदार स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

**खरीप हंगाम-२०२०-२१**

विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र २१.१९ लाख हेक्टर असून दि.१३ जुलै, २०२० अखेर १७.९८ लाख हेक्टर क्षेत्रावर (८४.८६%) पेरणी झाली आहे. विभागात भात व नागली रोपवाटीकेतील रोपे वाढीच्या अवस्थेत असून लावणीची कामे सुरू आहेत. मका, तूर, भुईमूग, तीळ, सुर्यफुल, सोयाबीन व जिरायती कापूस पिकांची पेरणी अंतिम टप्प्यात आहे. पेरणी झालेली पिके उगवण ते वाढीच्या अवस्थेत आहेत.

**किड व रोग -**

विभागात काही ठिकाणी मका पिकावर लष्करी अळीचा, सोयाबीन पिकावर गर्डल बीटल व खोडमाशीचा, कापूस पिकावर गुलाबी बोंड अळी व ज्वारी पिकावर लष्करी अळीचा प्रादुर्भाव दिसून आला.

**पुणे विभाग-**

**हवामान-** अहवाल कालावधीत विभागात आकाश ढगाळ होते. तसेच बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या तर तुरळक ठिकाणी जोरदार स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

**खरीप हंगाम-२०२०-२१**

विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र ८.६७ लाख हेक्टर असून दि.१३ जुलै, २०२० अखेर ९.३६ लाख हेक्टर क्षेत्रावर (१०७.९५%) पेरणी झाली आहे. विभागात भात व नाचणी रोपवाटीकांमध्ये पेरणीची तसेच काही ठिकाणी भात पुर्नलागवडीची कामे सुरु आहेत. तूर, मुग, उडीद, भुईमूग, सुर्यफुल व सोयाबीन पिकांची पेरणी अंतिम टप्प्यात असून पेरणी झालेली पिकांची वाढ समाधानकारक आहे.

**किड व रोग -**

विभागात मका पिकावर लष्करी अळीचा, सोयाबीन पिकावर गर्डल बीटल, खोडमाशी व उंट अळी, कापूस पिकावर गुलाबी बोंड अळी, मावा तुडतुडे व ऊस पिकावर हुमणी इत्यादींचा प्रादुर्भाव दिसून आला.

**कोल्हापूर विभाग-**

**हवामान-** अहवाल कालावधीत विभागात आकाश ढगाळ होते. तसेच बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या तर तुरळक ठिकाणी जोरदार ते अतिजोरदार स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

**खरीप हंगाम-२०२०-२१**

विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र ८.१४ लाख हेक्टर असून दि.१३ जुलै, २०२० अखेर ६.८९ लाख हेक्टर क्षेत्रावर (८४.६२%) पेरणी झाली आहे. विभागात भात पुर्नलागवडीची कामे सुरु आहेत. धुळवाफ पेर भात वाढीच्या अवस्थेत आहे. भुईमूग पिक वाढ ते फुलोरा अवस्थेत तर इतर पिके वाढीच्या अवस्थेत आहेत. नवीन अडसाली ऊसाची लावणी चालू आहे. गळीतास जाणारा ऊस जोमदार वाढीच्या अवस्थेत आहे. पिकांमध्ये आंतरमशागतीचे व खते देण्याची कामे चालू आहेत.

**किड व रोग -**

विभागात मका पिकावर लष्करी अळीचा, सोयाबीन पिकावर उंट अळीचा व ऊस पिकावर लष्करी अळीचा प्रादुर्भाव दिसून आला.

**औरंगाबाद विभाग-**

**हवामान**- अहवाल कालावधीत विभागात आकाश ढगाळ होते. तसेच बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या तर तुरळक ठिकाणी जोरदार स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

**खरीप हंगाम-२०२०-२१**

विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र २०.२३ लाख हेक्टर असून दि.१३ जुलै, २०२० अखेर १९.२७ लाख हेक्टर क्षेत्रावर (९५.२८%) पेरणी झाली आहे. विभागात कापूस, मका, बाजरी, तूर, मुग, उडीद, सोयाबीन इत्यादी पिकांची पेरणी अंतिम टप्प्यात आहे. पिके उगवण ते वाढीच्या अवस्थेत असून वाढ समाधानकारक आहे.

**किड व रोग -**

विभागात मका पिकावर लष्करी अळीचा, सोयाबीन पिकावर उंट अळी, पाने खाणारी अळी, गर्डल बीटल व खोडमाशीचा व कापूस पिकावर गुलाबी बोंड अळी, अमेरिकन बोंड अळी व मावा तुडतुडे या किडींचा प्रादुर्भाव दिसून आला.

**लातूर विभाग-**

**हवामान**- अहवाल कालावधीत विभागात आकाश ढगाळ होते. तसेच बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या तर तुरळक ठिकाणी जोरदार स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

**खरीप हंगाम-२०२०-२१**

विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र २७.९४ लाख हेक्टर असून दि.१३ जुलै, २०२० अखेर २३.५२ लाख हेक्टर क्षेत्रावर (८४.१७%) पेरणी झाली आहे. विभागात खरीप पिकांच्या पेरणीची कामे झाली असून, पिके उगवण ते वाढीच्या अवस्थेत आहेत. सोयाबीन, मुग, उडीद, तूर व कापूस पिकांमध्ये आंतरमशागतीची कामे सुरू आहेत.

**किड व रोग -**

विभागात सोयाबीन पिकावर गर्डल बीटलचा प्रादुर्भाव दिसून आला.

**अमरावती विभाग-**

**हवामान**- अहवाल कालावधीत विभागात आकाश ढगाळ होते. दिवस व रात्रीच्या तपमानात घट झाली असून आद्रतेचे वाढले आहे. तसेच बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या तर तुरळक ठिकाणी जोरदार स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

**खरीप हंगाम-२०२०-२१**

विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र ३२.१३ लाख हेक्टर असून दि.१३ जुलै, २०२० अखेर २८.६६ लाख हेक्टर क्षेत्रावर (८९.१८%) पेरणी झाली आहे. विभागात पिके उगवण ते वाढीच्या अवस्थेत आहेत. तूर व कापूस पिकांमध्ये आंतरमशागतीची कामे सुरू आहेत.

**किड व रोग -**

विभागात सोयाबीन पिकावर गर्डल बीटल व खोडमाशीचा, कापूस पिकावर गुलाबी बोंड अळी, अमेरिकन बोंड अळी इत्यादींचा प्रादुर्भाव दिसून आला.

**नागपूर विभाग-**

**हवामान** - अहवाल कालावधीत विभागात आकाश ढगाळ होते. तपमानात घट झाली आहे. तसेच बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या तर तुरळक ठिकाणी जोरदार त अतिजोरदार स्वरुपाच्या पावसाची नोंद झाली.

**खरीप हंगाम-२०२०-२१**

विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र १९.२६ लाख हेक्टर असून दि.१३ जुलै, २०२० अखेर ११.१६ लाख हेक्टर क्षेत्रावर (५७.९५%) पेरणी झाली आहे. विभागात सोयाबीन, तूर, कापूस पिकांची पेरणी सुरु आहे. पेरणी झालेली पिके उगवण ते वाढीच्या अवस्थेत आहेत. पिकांमध्ये आंतरमशागतीचे कामे सुरु आहेत. भात पऱ्हे टाकलेले आहे व आवत्यांची पेरणी झालेली आहे. तसेच काही ठिकाणी भात पुर्नलागवडीची कामे सुरु आहेत.

**किड व रोग -**

विभागात भात पिकावर गादमाशीचा, सोयाबीन पिकावर गर्डल बीटल व खोडमाशी इत्यादींचा प्रादुर्भाव दिसून आला.

| महाराष्ट्र राज्यातील खरीप हंगामातील मुख्य पिकाखालील दि. १३.०७.२०२० पर्यंत पेरणी अहवाल | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | क्षेत्र- हेक्टरमध्ये | |
| अ.क्र. | पिके | सरासरी क्षेत्र (सन २०१४-१५ ते २०१८-१९) | मागिल वर्षाची पेरणी (दि.१२/०७/२०१९) | प्रत्यक्ष पेरलेले क्षेत्र | प्रत्यक्ष पेरलेल्या क्षेत्राची सरासरी क्षेत्राशी टक्केवारी | प्रत्यक्ष पेरलेल्या क्षेत्राची मागिल वर्षाच्या क्षेत्राशी टक्केवारी | +/- प्रत्यक्ष पेरणी क्षेत्राची मागिल वर्षाशी तुलना |
| १ | भात | १५०३११९ | २५५०४५ | ३५४४४८ | २४ | १३९ | ३९ |
| २ | खरीप ज्वारी | ४८३२२८ | १८६१८८ | २४१२७१ | ५० | १३० | ३० |
| ३ | बाजरी | ६७१५९४ | २४६९९० | ५४२७०४ | ८१ | २२० | १२० |
| ४ | रागी | ९५५१० | ७८२५ | २२८१४ | २४ | २९२ | १९२ |
| ५ | मका | ८३८४७५ | ५०७००६ | ७८०२९९ | ९३ | १५४ | ५४ |
| ६ | इतर तृणधान्य | ५२६६५ | ८६९७ | १५१६४ | २९ | १७४ | ७४ |
| **खरीप तृणधान्य** | | **३६४४५९१** | **१२११७५०** | **१९५६६९९** | **५४** | **१६१** | **६१** |
| ७ | तूर | १२७४५७६ | ६८९७३४ | ११००२३७ | ८६ | १६० | ६० |
| ८ | मुग | ४८३६२५ | १९७७५७ | ३४४५७९ | ७१ | १७४ | ७४ |
| ९ | उडिद | ३५९१५३ | १६०२७६ | ३१६५४४ | ८८ | १९७ | ९७ |
| १० | इतर कडधान्य | १००३४९ | २८८५६ | ६२७०४ | ६२ | २१७ | ११७ |
| **एकूण कडधान्य** | | **२२१७७०४** | **१०७६६२३** | **१८२४०६३** | **८२** | **१६९** | **६९** |
| **एकूण अन्नधान्य** | | **५८६२२९४** | **२२८८३७३** | **३७८०७६३** | **६४** | **१६५** | **६५** |
| ११ | भुईमुग | २०२२९८ | ९६८१८ | १७६०९४ | ८७ | १८२ | ८२ |
| १२ | तीळ | २३६८६ | ५०७५ | ६८६८ | २९ | १३५ | ३५ |
| १३ | कारळ | १९८२७ | १९४६ | ३८६१ | १९ | १९८ | ९८ |
| १४ | सुर्यफुल | १७९८० | ४६२८ | ९७७३ | ५४ | २११ | १११ |
| १५ | सोयाबीन | ३८८०२४४ | २३११७७७ | ३८१७५३९ | ९८ | १६५ | ६५ |
| १६ | इतर गळीतधान्य | १३८४६ | २१८५ | ३७३८ | २७ | १७१ | ७१ |
| **एकूण तेलबिया** | | **४१५७८८२** | **२४२२४३०** | **४०१७८७२** | **९७** | **१६६** | **६६** |
| **१७** | **कापूस** | **४१७८४११** | **३३२१९४९** | **३९८३२०३** | **९५** | **१२०** | **२०** |
| **एकूण पेरणी क्षेत्र** | | **१४१९८५८८** | **८०३२७५१** | **११७८१८३८** | **८३.०** | **१४७** | **४७** |
| **१८** | **उस (लागवडीचा)** | **९३५१७९** | **२८११८** | **९००८४** | **१०** | **३२०** | **२२०** |
| **एकूण पेरणी क्षेत्र (ऊसासह)** | | **१५१३३७६७** | **८०६०८६९** | **११८७१९२२** | **७८.४** | **१४७** | **४७** |
| टिप- पेरणी क्षेत्र नजर अंदाजीत | | | | | | | |